सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी
मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
माझे नांव :— अशोक शाहुराव जमदाडे
वय :— ६३ वर्षे व्यवसाय :— शेती
राहणार :— कामखेडा ता. जि. बीड

---

**सरतपासणी { ॲड.ए.बी.तिडके सहा.सरकारी वकील }**

०१. मला दोन मुले असून पत्नीचे नाव लता आहे. माझे छोट्या मुलाचे नाव गणेश असून मोठ्या मुलाचे नाव अनिल होते. अनिल सध्या हयात नाही. अनिल याचे लग्न काठोडा येथील आरोपी क्रमांक १ अर्चना भिमराव डाके हिच्याशी झाले होते. लग्न संबंधातून अनिल यास दोन मुली अमृता व अदिती आहेत. लग्नानंतर अनिल त्याचे पत्नीसह कामखेडा येथेच आमच्या घरी परंतू स्वतंत्र खोलीत राहात होते. त्यांना दोन खोल्या स्वतंत्र राहण्यासाठी दिल्या होत्या. लग्न झाल्यापासून त्यांचे सतत आपसात भांडण होत होते. थोडे भांडण झाले तरी अर्चना तिच्या वडीलांना, मामाला फोन करायची व ते लगेच यायचे व ती माहेरी निघून जायची. मी व माझी पत्नी आणायला जायचो. आम्ही अर्चनाला आणायला १४ जून २०२० रोजी गेलो होतो. परंतू तिचे वडील म्हणाले की, आम्ही तिला पाठवत नाही. तुम्ही तिच्या मामाकडे जा. अर्चना म्हणाली की, अनिल मेल्यावर मी येते. २ एकर शेती सुध्दा मुलाकडून तिने नावावर करून घेतली. तिने अनिलला त्या शेतात यायचे नाही असे सांगितले व मी माझे शेत पाहीन असे म्हणाली. त्यामुळे माझा मुलगा खचला. दिनांक १८/०६/२०२० रोजी दिवसभर माझा मुलगा मला दिसलाच नाही. मी रात्री लघुशंकेला अंदाजे ०१.०० वाजता उठलो असता स्लॅपच्या हुकला मुलगा लटकलेला दिसला. त्याने जिन्यावर चिठ्ठी लिहून ठेवलेली होती. पोलीस तेथे आले. त्यांनी ती चिठ्ठी जप्त केली. पोलीसांनी ती चिठ्ठी वाचून पाहिली होती. त्याने त्याच्या हातापायावर सुध्दा काही तरी लिहीलेले होते. पोलीसांनी सर्व फोटो काढले. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. माझे मुलाला त्याचे बायकोने खुप त्रास दिला. तिने माझे मुलाचे कपडे जाळले. तिच्या त्रासामुळे माझे मुलाने आत्महत्या केली. मला आता दाखविण्यात आलेली फिर्याद मीच दिलेली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील

मजकूर बरोबर आहे. ती निशाणी ३९ वर आहे. आज रोजी माझी सुन अर्चना व तिचे मामा अर्जुन कोर्टासमोर हजर आहेत. शुभम कोर्टात हजर नाही.

**साक्षीदाराच्या विनंती वरून सरतपास पुढील तारखेपावेतो तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

***Sd/-***

**( रेणूका मा. सातव )**

दिनांक : ०१/०१/२०२६

अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड